**Office of the Supdt. Of Police, Amravati Rural**
**पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांचे कार्यालय.**
जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, कॅम्प रोड, अमरावती-४४४६०२
**दूरध्वनी क्र.** ७२१/२६६५८००. **Email ID :-** sp.amravati.r@mahapolice.gov.in

16 MAR 2022

जा.क्र:पोअअग्रा/पशा-५/**सार्वत्रिक बदल्या-२०२२/पोमसं/२०२२**-2688 अमरावती ग्रा. दि. -

**संदर्भ:-** १) सन - २०१४ चा महाराष्ट्र चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दि. २५/०६/२०१४ व
२) सन - २०१५ चा महाराष्ट्र चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दि. ०६/०४/२०१५
३) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.पोमसं/३/१०/६/सार्वत्रिक बदल्या-२०२२/३६/२०२२, दि. १०/३/२०२२

**विषय :-** नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या -२०२२ करीता माहिती पाठविणेबाबत:

---ooo---

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये अमरावती ग्रामीण आस्थापनेवर कार्यरत नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक यांना कळविण्यांत येते की, मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील परिपत्रक दिनांक १०/०३/२०२२ अन्वये **"सार्वत्रिक बदल्या - २०२२"** प्रमाणे अर्ज मागविण्यांत आलेले आहेत. जे पोलीस अधिकारी हे **परिक्षेत्रिय विहीत कालावधी पूर्ण** करीत आहे त्यांनी बदलीस अनुसरुन विनंतीचे ठिकाण दयावीत. तसेच **मुदतपूर्व बदलीचे** अनुषंगाने सबळ कारणा व कागदपत्रांसह मा. पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयास अंकितकरुन अर्ज दोन (०२) प्रतित सादर करावे. सदरचे अर्ज दिनांक २१/०३/२०२२ पर्यत या कार्यालयास पोहचतील याबेताने पाठवावे. तसेच अर्जासोबत विहीत नमुना प्रपत्रातील अचुक माहिती नचुकता सोबत सादर करावी.

तसेच मा. पोलीस महासंचालक, महा. रा., मुंबई यांचे कार्यालयास दिनांक १०/०३/२०२१ पुर्वी सादर करण्यांत आलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज मा. पो.म.सं. महा. राज्य, मुंबई यांचे परिपत्रक दिनांक १०/०३/२०२२ अन्वये रद्द करण्यांत आलेले आहे याची संबंधितांना नोंद घ्यावी. पाठविलेलेल सर्व प्रकारचे विनंती अर्ज या परिपत्रकाद्वारे रद्द समजण्यात येत आहे याची कृपया नोंद घ्यावी.

प्रस्तुत प्रकरणी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक दिनांक १०/०३/२०२२ व विहीत नमुना विवरणपत्र अमरावती ग्रामीण येथिल संकेतस्थळ **www.amravatiruralpolice.gov.in/flash** यावर उपलब्ध करण्यांत येत आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

( अविनाश बारगळ )
पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण.

**प्रति,**
**सर्व** उपविभागीय पोलीस अधिकारी/पोस्टे ठाणेदार /शाखा प्रमुख, अमरावती ग्रामीण.
महामार्ग सुरक्षा पथक/नागरी हक्क संरक्षण, अमरावती ग्रा.
पोनि दिनेश **शेळके**, संलग्न पो.उप.महा.निर., अम. परिक्षेत्र, अम. मार्फत पो.उप.महा.निर., अम. परिक्षेत्र, अमरावती

**प्रत:-** प्रभारी अधिकारी, पोस्टे सायबर, अमरावती ग्रामीण.
२/- सदरचे सदरचे पत्र (दि. १८/३/२०२१ चे परिपत्रक, विहीत नमुना विवरणपत्रासह) **पोलीस अधिकारी यांच्या** सार्वत्रिक बदल्या - **२०२२ माहिती/परिपत्रक** या विषयाखाली पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण कार्यालयाच्या संकेत स्थळावर **www.amravatiruralpolice.gov.in/flash** येथे उपलब्ध करुन दयावे.

Scanned with CamScanner

